**L. A. BILL No. CI OF 2025.**

A BILL

FURTHER TO AMEND THE HYDERABAD ABOLITION OF INAMS AND CASH GRANTS ACT, 1954.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०१.**

**हैदराबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५४ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक ११ डिसेंबर, २०२५ रोजी सुधारणेसह संमत केल्याप्रमाणे.)**

१९५५ चा हैदराबाद अधिनियम क्रमांक ८.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, हैदराबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५४ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :–

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, हैदराबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे.



एचबी १३०८— १

सन १९५५ चा हैदराबाद अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ६ ची सुधारणा.

१९५५ चा हैदराबाद अधिनियम क्रमांक ८.

**२.** हैदराबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५४ याच्या कलम ६ मध्ये, पोट-कलम (३) मधील, खंड (ब) मधील, विद्यमान परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :–

" परंतु आणखी असे की, प्रारंभाच्या दिनांकापूर्वी भोगवटादाराकडून, नवीन व अविभाज्य शर्तींवर (भोगवटादार वर्ग-दोन) धारण केलेल्या मदद मश इनाम जमिनींच्या अशा कोणत्याही भोगवट्याचे, जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा इतर कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीशिवाय, निवास प्रयोजनासाठी, आधीच हस्तांतरण करण्यात आलेले असेल तर, अशा हस्तांतरणाचा पुरावा म्हणून, विक्री खत, बक्षीसपत्र, भाडेपट्टा करार, इत्यादींसारखे, नोंदणीकृत संलेख किंवा जर असे नोंदणीकृत संलेख उपलब्ध नसतील तर अशा हस्तांतरणाचा पुरावा म्हणुन स्थानिक स्वराज्य संस्थेकडील मालमत्ता कर अकारणी नोंदवहीची प्रमाणित प्रत सादर केल्यानंतर, नजराणा म्हणून कोणतीही रक्कम प्रदान न करता, असे हस्तांतरण, आदेशाद्वारे जिल्हाधिकाऱ्यास नियमित करता येईल ; आणि त्यानंतर, अशी जमीन, अशा आदेशाच्या दिनांकापासून, हस्तांतरिती भोगवटादाराने, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याच्या तरतुदींनुसार, भोगवटादार वर्ग-एक म्हणून धारण केलेली असल्याचे मानण्यात येईल. ".

१९६६ चा महा. ४१.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

हैदराबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५४ (१९५५ चा हैदराबाद अधिनियम क्रमांक ८) यामध्ये, महाराष्ट्र राज्याच्या हैदराबाद क्षेत्रातील इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत तरतूद केलेली आहे. मूळतः, उक्त अधिनियमाच्या कलम ६ च्या पोट-कलम (३) मध्ये अशी तरतूद केलेली होती की, कलम ६ च्या पोट-कलम (१) अन्वये मंजूर केलेला भोगवटा, जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्व मंजुरीशिवाय आणि राज्य शासनाला विवक्षित रक्कम प्रदान केल्याखेरीज, हस्तांतरणीय किंवा विभाजनीय असणार नाही.

**२.** अशा मदद मश इनाम जमिनींच्या मोठ्या संख्येतील भोगवटादारांनी, उक्त अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करून अशा जमिनी हस्तांतरित केलेल्या आहेत. म्हणून, शासनाने, सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ याद्वारे उक्त अधिनियमाच्या कलम ६ च्या पोट-कलम (३) ऐवजी, पोट-कलम बदली दाखल केले आणि अशा जमिनीच्या चालू बाजार मूल्याच्या पन्नास टक्के इतकी रक्कम नजराणा म्हणून आणि विवक्षित रक्कम दंड म्हणून राज्य शासनाला प्रदान केल्यावर, इनाम जमिनींचे हस्तांतरण करण्याची, अनधिकृत हस्तांतरण नियमित करण्याची व भोगवट्यांचे रुपांतर करण्याची तरतूद केली आहे.

लोकप्रतिनिधींकडून प्राप्त झालेली विविध निवेदने आणि शासनाने स्थापन केलेल्या समितीच्या शिफारशी विचारात घेता, शासनाने, सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ याद्वारे अशा इनाम जमिनींचे हस्तांतरण करण्यासाठी, हस्तांतरण नियमित करण्यासाठी व भोगवट्याचे रुपांतर करण्यासाठी अशा नजराण्याची रक्कम, अशा जमिनीच्या चालू बाजार मूल्याच्या पाच टक्के इतकी कमी केली आहे.

**३.** अनेक भोगवटादारांनी, बेकायदेशीरपणे हस्तांतरित करण्यात आलेल्या अशा जमिनींवर घरे बांधली आहेत आणि ते, अनेक वर्षांपासून तेथे राहत आहेत. असे निदर्शनास आले आहे की, अशा नियमितीकरणासाठी नजराण्याची रक्कम कमी केल्यानंतर देखील मोठ्या संख्येतील असे भोगवटादार, अशा नियमितीकरणासाठी नजराणा प्रदान करण्याकरिता पुढे येत नाहीत. म्हणून, शासनास, जनहितार्थ, नजराणा म्हणून कोणतीही रक्कम प्रदान न करता आणि अशा हस्तांतरणाचा पुरावा म्हणून नोंदणीकृत संलेख सादर केल्यावर, जिल्हाधिकाऱ्याद्वारे निवासी प्रयोजनासाठीच केवळ असे हस्तांतरण नियमित करण्यासाठी आणि त्यानंतर, अशी जमीन,हस्तांतरिती भोगवटादाराने, भोगवटादार वर्ग-एक म्हणून धारण केलेली असल्याचे मानण्यात येईल तरतूद करण्याकरिता उक्त अधिनियमाच्या कलम ६ च्या पोट-कलम (३) मध्ये सुधारणा करणे इष्ट आहे असे वाटते.

**४.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

नागपूर.
दिनांक ९ डिसेंबर, २०२५.

**चंद्रशेखर बावनकुळे,**
महसूल मंत्री.

## सन २०२५ चे वि.स. विधेयक क्रमांक १०१ – हैदराबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२५ याचे परिशिष्ट.

**(हैदराबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५४ यातील उतारे.)**

**(सन १९५५ चा हैदराबाद अधिनियम क्रमांक ८ )**

| | | | |
|---|---|---|---|
| १. ते ५. | XX | XX | XX |
| ६. (१) व (२) | XX | XX | XX |
| (३) (अ) | XX | XX | XX |

कलम ५ लागू नसलेल्या भोगवट्यातील जमिनींच्या बाबतीत भोगवट्याचे हक्क.

(ब) प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, जर भोगवटादाराने, नवीन व अविभाज्य शर्तीवर ( भोगवटादार वर्ग दोन ) धारण केलेल्या मदद मश इनाम जमिनींच्या कोणत्याही भोगवट्याचे जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा इतर कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीशिवाय किंवा ना-हरकत प्रमाणपत्राशिवाय कृषीसंबंधी प्रयोजनासाठी, आधीच हस्तांतरण केले असेल तर, अशा हस्तांतरणाचा पुरावा म्हणून, त्याचे विक्री खत, बक्षीसपत्र, इत्यादींसारखे नोंदणीकृत संलेख सादर केल्यानंतर, नजराणा म्हणून कोणतीही रक्कम प्रदान न करता, असे हस्तांतरण नियमित करता येईल. असे हस्तांतरण नियमित करण्यात आल्यानंतर, अशा जमिनीचा भोगवटा अशा हस्तांतरिती भोगवटादाराने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ याच्या तरतुदीनुसार भोगवटादार वर्ग दोन म्हणून धारण केला असल्याचे मानण्यात येईल :

परंतु, प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, जर भोगवटादाराकडून, नवीन आणि अविभाज्य शर्तीवर ( भोगवटादार वर्ग दोन ) धारण केलेल्या मदद मश इनाम जमिनींचा असा कोणताही भोगवटा, जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा इतर कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीशिवाय कृषीतर उपयोगासाठी आधीच हस्तांतरित करण्यात आला असेल तर, अशा नियमितीकरणाच्या आदेशाच्या दिनांकास अशा जमिनीच्या बाजार मूल्याच्या पन्नास टक्के इतकी रक्कम नजराणा म्हणून आणि अशा रकमेच्या दहा टक्के इतकी रक्कम दंड म्हणून प्रदान केल्यानंतर असे हस्तांतरण नियमित करता येईल आणि अशी रक्कम प्रदान करण्यात आल्यावर, भोगवटादाराने, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या तरतुदींनुसार ती जमीन अशा आदेशाच्या दिनांकापासून भोगवटादार वर्ग एक म्हणून धारण केली असल्याचे मानण्यात येईल.

| | | | |
|---|---|---|---|
| (क) | XX | XX | XX |
| (४) ते (६) | XX | XX | XX |
| (७) ते ३८. | XX | XX | XX |

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०१]**

**[ हैदराबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५४ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक. ]**

**(श्री. चंद्रशेखर बावनकुळे,**
महसूल मंत्री.)

**(विधानसभेने दिनांक ११ डिसेंबर, २०२५ रोजी सुधारणेसह संमत केल्याप्रमाणे.)**

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.